एतदर्थ मंडळाच्या हिंदी भाषा परीक्षा
राज्य शासकीय अधिकारी आणि कर्मचारी
यांनी उत्तीर्ण होण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक:-हिंभाप-१०८७/१७१४/प्र. १२९/८७/२०,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक :- २२ सप्टेंबर, १९८८.

पहा :-शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक हिंभाप-
१०८२ /९०७/प्र. २०३/२०, दि. २७ जानेवारी, ८३.

======

शासन निर्णय

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-हिंभाप-१०८२/९०७/प्र. २०३/२०, दिनांक २७ जानेवारी, १९८३ अन्वये हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्याची मुदत दिनांक ३० जून, १९८२ पर्यंत वाढविण्यात आली होती. शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, ही मुदत दिनांक ३० डिसेंबर, १९९१ पर्यंत वाढविण्यात यावी. जे अधिकारी कर्मचारी दि. ३० डिसेंबर, १९९१ पर्यंत सदर परीक्षा उत्तीर्ण होणार नाहीत त्यांना दिनांक ३० डिसेंबर १९९१ च्या पुढे मुदतवाढ मिळणार नाही.

२. पूर्वीची मुदतवाढ असलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच दिनांक ३० जून, १९८२ पर्यंत हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण न झाल्यामुळे अथवा हिंदी भाषा परीक्षेतून सूट न मिळाल्यामुळे त्यांची वेतनवाढ रोखण्यात आलेली आहे अशा अधिका-यांना आणि कर्मचा-यांना दि. ३० डिसेंबर, १९९१ पर्यंत देय असलेली वेतनवाढ देण्यात यावी व ज्यांच्याबाबत वेतनवाढ रोखली गेली होती त्यांना वेतनवाढीची थकबाकी देण्यात यावी असेही आदेश देण्यात येत आहेत.

३. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक सीआर-६९०/८७/सेवा-३, दि. ३-७-८७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-xxx
[वि. गो. पाध्ये]
शासनाचे उप सचिव.

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी.

.....................

क्र. कार्यासन/महसूल/आस्थापना/५/१६३१९.
जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी. ता. १४-१०-१९८८.

18.10.88

प्रत, माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित ----
उप विभागीय अधिकारी [सर्व] / विशेष भू संपादन अधिकारी [सर्व] / तहसीलदार [सर्व]/
सर्व शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी.